**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र. ३०९७ दि. २६ /०९ /२०१९**

**पोलीस स्टेशन :- येरवडा पो.स्टे., पुणे शहर**

**येरवडा पोलीस स्टेशनकडील खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपीस १ वर्षाची शिक्षा झालेबाबत.**

दिनांक १५/१२/२०१२ रोजी २०:०० वा. सुमारास स.नं.८, यशवंतनगर, जय भवानी प्रोव्हीजन स्टोअर्स, येरवडा, पुणे येथे यातील आरोपी नामे **दिपक ऊर्फ वाल्ह्या छबु गायकवाड वय- २० वर्षे रा. स. नं. ८, यशवंतनगर, येरवडा पुणे** याने यातील फिर्यादी नामे सौ. सुनंदा देवीलाल चौधरी रा. सदर या व त्यांची मुलगी कांचन असे दुकानात असताना त्याने दुकानात येऊन तुझा नवरा मला हप्ता देत नाही मला हप्ता म्हणुन महिन्याला ५००/- रुपये दे असे म्हणुन फिर्यादीचे मुलीस मारहाण करुन फिर्यादीचे डोक्यात कोयता मारुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेने त्याबाबत यातील फिर्यादी यांनी तक्रार दिल्यावरुन येरवडा पोलीस स्टेशन येथे **गु.र.नं.५४९/२०१२ भा.द.वि. कलम ३०७, ३८५, ३८७, ३२३, ५०४ आर्म ॲक्ट ४ (२५)** प्रमाणे गुन्हा दिनांक १६/१२/२०१२ रोजी दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास तात्कालीन सहा. पोलीस निरीक्षक श्री. साळुंके नेमणुक – येरवडा पोलीस स्टेशन, पुणे यांनी करुन आरोपी विरुद्ध सबळ पुरावा मिळवुन त्याचेविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदरची केस मा. जी. पी. आगरवाल अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, शिवाजीनगर कोर्ट, पुणे यांचे न्यायालयात सुरु असताना येरवडा विभागाचे सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. रामचंद्र देसाई, येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. युनूस शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस उप- निरीक्षक राजेंद्र कांबळे कोर्ट कर्मचारी पोहवा. १०८ चिकणे व पोहवा. ५३२४ शेलार यांनी सातत्याने पाठपुरावा करुन दाखल गुन्ह्यातील पंच, साक्षीदार यांना साक्षकामी न्यायालयात वेळेत हजर करुन त्यांना योग्यते मार्गदर्शन व संरक्षण दिल्याने यातील पंच व साक्षीदार यांनी निर्भय वातावरणामध्ये सरकारी पक्षाचे बाजुने साक्ष दिलेली असुन मा. जी. पी. आगरवाल अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, शिवाजीनगर कोर्ट, पुणे यांनी यातील आरोपीस ०१ वर्षे कैद व ५००/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. सदर केसमध्ये सरकारी पक्षाचे वतीने ॲड. मोरे यांनी काम पाहीले आहे.